# बार्टीतर्फे लोकशाहिरांना अभिवादन

**मालेगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेंतर्गत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती ऑनलाइन साजरी करण्यात आली. तीनदिवसीय मार्गदर्शनपर कार्यक्रम झाले. त्यात सुनील वाघ यांनी अण्णा भाऊंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी समीक्षक प्रा. डॉ. दीपकराज कापडे होते. दुसऱ्या दिवशी मराठी विभागप्रमुख डॉ. मनोहर शिरसाठ यांनी 'माझी मैना गावाकर राहिली' या छक्कडविषयी संयुक्त महाराष्ट्रातील संकल्पना विशद केली. सामाजिक कार्यकर्ते भगवान चित्ते यांनी अध्यक्षस्थान भूषविले. डॉ. सुरेश चौथाईवाले यांनी मार्गदर्शन केले. आयोजन शुद्धोधन तायडे, धम्मदीप म्हस्के, विशाल पाटील, विशाल पोटिंदे, रूपाली आढाव, शालिनी ठाकरे आदींनी केले होत.

# बार्टीतर्फे साठे जयंती साजरी

**सायखेडा :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती कोरोनामुळे साध्या पद्धतीने साजरी करण्यात आली. चांदोरी येथे ऑनलाइन पद्धतीने जयंती साजरी करत अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांचे साहित्य, समाजकार्य याबाबत निफाडचे तहसीलदार दीपक पाटील यांनी मार्गदर्शन केले. मंगला गायकवाड व सचिन कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. बार्टी व चांदोरी येथील साहित्यरत्न प्रतिष्ठानतर्फे साठे जन्मशताब्दी जयंती उत्सव झूम ॲपच्या साहाय्याने साजरा करण्यात आला. यात बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, समतादूत प्रकल्पाच्या मुख्य संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाडचे तहसीलदार दीपक पाटील, प्रतिज्ञा दाभाडे, समतादूत मंगला गायकवाड, प्रियंका

# बार्टीच्या समतादुतांनी अण्णाभाऊ साठे यांची ऑनलाईन जयंती केली साजरी

नांदेड,(प्रतिनिधी)-महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे समतादूत प्रकल्पाच्या वतीने कोरोनाच्या या भितीदायक वातावरणात लोकांना भयमुक्त जीवन जगण्याचे तसेच आरोग्याची काळजी घेत शासनाच्या आदेशाचे पालन करण्याचे आवाहन करत समतादूत सक्रिय आहेत. या कामासोबतच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध उपक्रम समतादूत प्रकल्पाच्या वतीने राबविण्यात आले. त्यामध्ये व्याख्यान, चर्चासत्र, गायन हे झूम ऍपच्या माध्यमातून घेण्यात आले. नांदेड जिल्ह्यात समतादूत यांनी आपापल्या तालुक्यात या कार्यक्रमाचे आयोजन करून अभिवादन केले.



या ऑनलाईन जयंतीच्या उपक्रमात समतादुतांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर प्रकाश टाकण्यासाठी विविध क्षेत्रांतील नामवंत वक्ते, साहित्यिक,लेखक-कवी, शाहीर, प्राध्यापक, गायक, प्रबोधनकार, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधींना सहभागी करून एक ऑनलाईन वैचारिक परिवर्तनाची मेजवानी समाजाला देण्याचा प्रयत्न समतादुतांनी केला. समतादूत हे महामानव, संत, सामाजिक समतेचा प्रचार-प्रचार करून समाजाला एकसंघ, एकता, शांतता राखण्याचे काम प्रबोधनातून करतात.

प्रत्येक तालुक्यात समतादुतांनी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करून ऑनलाईन जयंतीचा कार्यक्रम यशस्वी केला.यात समतादूत शेख इर्शाद, दिगंबर पोतुलवार, बालाजी डुमणे, ज्योती जाधव, दीपाली हाडोळे, जयश्री गायकवाड, राणी बंडेवार, जगदीश निवळे, विनोद पाचंगे, नागनाथ कोलमारे, दिलीप सोंडारे, शारदा माळी, अविनाश जोंधळे, अमित कांबळे यांनी अण्णाभाऊ साठे यांचा जन्मशताब्दी महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा केला.

बार्टीचे महासंचालक कैलास कणसे यांच्या संकल्पनेतून निबंधक यादव गायकवाड, मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे, जिल्हा प्रकल्प अधिकारी सुजाता पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची ऑनलाईन जयंती साजरी करण्यात आली.

एकजूट
# लोकजागृती
email-elokjagruti@gmail.com

मुख्य संपादक- श्री. महादेव घोणे मो.-7775067600 संपादक- श्री. श्रीकांत पाटील - मो.-9011173222

र्ष - १ ले | अंक - १८१ वार-शुक्रवार, दि.-०७ ऑगस्ट २०२० | किंमत -२ रू. पाने - ४

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त बार्टी मार्फ़त ऑनलाईन व्याख्यान माला संपन्न




(उदगीर) -साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे मार्फत ऑनलाईन व्याख्यान माला दि.१ ते ३ ऑगस्ट २०२० दरम्यान संपन्न झाली, याला नागरिकांच उत्कृष्ट प्रतिसाद मिळाल्याची माहित जिल्हा प्रकल्प अधिकारी राजकुमार धनाशिरि सर यांनी दिली. साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे याची जन्म शताब्दी वर्ष बार्टीच्या वतीने विविध उपक्रम साजरे केली जात आहेत, त्याचाच भाग म्हणुन ही व व्याख्यान माला आयोजित करण्यात आली होती ,यात उदगीर येथील दलित चळवळीचे अभ्यासक प्रभाकर सूर्यवंशी , महाराष्ट्रतील प्रसिद्ध व्याख्याते डॉ. आर .एस. देवणीकर, खंडूजी बनसोडे आणि कणकवली येथील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. सोमनाथ कदम यानी अण्णाभाऊ च्या कार्यातील विविध पैलुवर प्रकाश टाकला , अण्णाभाऊच्या सहित्यातील विद्रोही नायक, अण्णाभाऊच्या सहित्यातील आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद अण्णाभाऊ चे स्वतंत्र लढ्यातील कार्य , संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील कार्य इत्यादि बाबीवर मान्यवर वक्त्यानी अभ्यास पूर्वक माडनी केली.

व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा प्रकल्प अधिकारी राजकुमार धनशीरे सर , समतादुत राम बनसोडे , सदाविजय पवार , पदमाकर कांबळे, सदाबहार पवार , गोविंद झाडके सचिव मोरे ,यानी परिश्रम घेतले.

सकाळ

# यूपीएससीबाबत ऑनलाइन प्रबोधन

## अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

दिग्रस, ता. ७ : साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समतादूत प्रकल्पाच्या संयोजनात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात यूपीएससीबाबत ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. त्याअंतर्गत यवतमाळ जिल्हा समतादूत टीमच्या मुख्य संयोजनात अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधन ऑनलाइन स्वरूपात घेण्यात आले.



**दिग्रस : ऑनलाइन यूपीएससी मार्गदर्शन कार्यक्रमात अध्यक्षस्थानी पत्रकार किशोर कांबळे. यावेळी उपस्थित अभय इंगळे.**

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पत्रकार किशोर कांबळे, मार्गदर्शक म्हणून अनिल खडसे (भा प्र सेवा मध्य प्रदेश) तसेच कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दिग्रस मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते तथा पत्रकार अभय इंगळे यांची होती.

सर्वप्रथम लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते हारार्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा प्रकल्प अधिकारी राहुल कऱ्हाळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मार्गदर्शक अनिल खडसे यांनी विद्यार्थ्यांना 'केंद्रीय नागरी सेवा संधी व आव्हाने' या विषयी मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यक्षेत्रातील समतादूत यांनी यावेळी आपला कार्यपरीचय दिला.

यामध्ये समतादूत मेघा पाटील (बाभूळगाव), किरण जाधव (मारेगाव), प्रकाश गाढवे (पांढरकवडा), अर्पिता वानकर (घाटंजी), कांचन भरणे (आर्णी), अश्विनी ढोकणे (यवतमाळ), रुपेश वानखडे (कळंब), मोहिनी तिघरकार (नेर), शीतल घावडे (नेर), किशोर शंकावार (वणी), श्रीकांत रोहनकर (राळेगाव), मनीषा खंडाळकर (यवतमाळ) आदींनी सहभाग नोंदविला. संचालन ज्योत्स्ना जांभूळकर यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर बडोले यांनी मानले. या ऑनलाइन यूपीएससी मार्गदर्शनाचे आयोजक बार्टी, पुणे व संयोजक समतादूत प्रकल्प यवतमाळ जिल्हा यांनी केले होते.

सायंदैनिक
# साईमत
(TM)

ईश्वर महाजन अमळनेर तालुका प्रतिनिधी
9860352960,9766939950

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समतादूत प्रकल्पांतर्गत ऑनलाईन जयंती महोत्सव

*अमळनेर : प्रतिनिधी*

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणेचे महासंचालक कैलास कणसे व मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पना व प्रेरणेने तसेच जळगाव जिल्हा समतादूत प्रकल्प अधिकारी भाग्यश्री पाईकराव यांच्या मार्गदर्शनाखाली एरंडोल- तालुक्यात दिनांक २५ जुलै ते १० ऑगस्ट पर्यंत ऑनलाइन प्रबोधनात्मक जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. या प्रबोधन कार्यक्रमात राज्यातील विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक आपले विचार ऑनलाईन विचार मंचावर मांडत आहेत.

दि.४ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती सुवर्णा पवार (कवयित्री-लेखिका), जिल्हा महिला बालविकास अधिकारी-सांगली यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर श्रीमती रत्नप्रभा भालेराव (ज्येष्ठ व्याख्याता डायट नाशिक), शुक्राचार्य श्री.गायकवाड (प्रसिद्ध साहित्यिक) अध्यक्ष-बौद्ध साहित्य प्रसार संस्था, सुमित्रा अहिरे (शिक्षण विस्तार अधिकारी, चोपडा), भाग्यश्री पाईकराव (प्रकल्प अधिकारी, जळगाव) यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते जळगाव जिल्ह्यातील अभ्यासू व्यक्तीमत्त्व भरत शिरसाठ (राज्याध्यक्ष समता शिक्षक परिषद) यांनी उपस्थितांना समताधिष्ठीत समाज व्यवस्थेसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 'लढाई' या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या ३० मिनीटांच्या व्याख्यानात शिरसाठ यांनी आण्णाभाऊंच्या साहित्य क्षेत्रातील योगदानासह त्यांच्या सामाजिक चळवळींबद्दलही सखोल माहिती दिली. आण्णाभाऊंनी उपेक्षितांचे दुःख आपल्या साहित्यातून चितारले. आपल्या साहित्यातून त्यांनी संघर्ष पेरला. 'जग बदल तू घालूनी घाव सांगून गेले मला भिमराव' असे म्हणत त्यांनी उपेक्षितांना बाबासाहेब आंबेडकरांच्या वाटेने जायला सांगितले. त्यांनी आपली राज्यशासन पुरस्कार प्राप्त 'फकिरा' कादंबरी बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली. आण्णाभाऊ साठेंनी केवळ दीड दिवस शाळेत जाऊन ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १३ वगनाट्य, ११ पोवाडे, १० लावण्या, ३ नाटके, प्रवासवर्णन अशी प्रचंड ग्रंथसंपदा निर्माण केली. त्यांच्या कथा कादंबऱ्यांवर चित्रपट निघाली. हे एक जागतिक आश्चर्यच म्हटले पाहिजे. एवढं सारं असूनसुद्धा येथल्या व्यवस्थेने त्याची दखल घेतली नाही. ते जिवंत असताना अनुल्लेखाने त्यांना हिनवले. त्यांच्या साहित्यावर वैफल्यग्रस्ततेचा शिक्का मारला. त्यांना साधं मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही दिले गेले नाही. आण्णाभाऊ जर सवर्ण समाजात जन्मले असते तर त्यांना आतापर्यंत भारतरत्न पुरस्कार सहज मिळाला असता, असे परखड प्रतिपादन शिरसाठ यांनी केले.

समतादूत एरंडोल तालुका यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शांताराम हटकर समतादूत एरंडोल तालुका यांनी आभार मानले. कार्यक्रमास राज्यातील शिक्षक, विद्यार्थी, समतादूत, नागरिक ऑनलाईन उपस्थित होते.

# बार्टीतर्फे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त ऑनलाईन काव्यसंमेलन

**मोहोळ / रिपोर्टर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे यांच्या वतीने लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑनलाईन काव्यसंमेलनाच्या द्वारे साजरी करण्यात आली.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता हा कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने साजरा केला. बार्टीचे महासंचालक कैलास कणसे व समतादूत प्रकल्पाच्या मुख्य प्रकल्प संचालिका श्रीमती प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पनेतून सबंध महाराष्ट्र ऑनलाईन कार्यक्रमाचे नियोजन केले आहे त्याच अनुषंगाने सोलापूर येथील मोहोळ तालुक्यामध्ये या ऑनलाईन काव्यसंमेलनाच्या माध्यमातून आगळ्या वेगळ्या पध्दतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवि मुकुंदराज कुलकर्णी होते. कविसंमेलनात सुमन चंदरशेखर, कवि प्रकाश गव्हाणे, कवि गोविंद काळे, अनुराधा पंडीत सहभागी होते. या संमेलनाचे सुत्रसंचलन अनुराधा पंडीत यांनी केले.किरण वाघमारे यांनी संमेलनाचे प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रमासाठी प्रणिता सोनकांबळे व समतादुत व काव्यारसिक उपस्थित होते.आभारप्रदर्शन नालंदा शिंदे यांनी केले. या काव्यसंमेलनासाठी ३० जण उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

# बार्टीमार्फत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची ऑनलाइन जयंती साजरी

प्रतिनिधी । मोहोळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑनलाइन काव्य संमेलनाद्वारे झाली.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता काव्यसंमेलनाचा कार्यक्रम ऑनलाइन करण्यात आला. बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, समतादूत प्रकल्पाच्या मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रत ऑनलाइन कार्यक्रमाचे नियोजन केले होते. मोहोळ तालुक्यामध्ये ऑनलाइन काव्यसंमेलनाच्या माध्यमातून आगळ्या वेगळ्या पध्दतीने अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कवी मुकुंदराज कुलकर्णी होते. सुमन चंदरशेखर, कवी प्रकाश गव्हाणे, कवी गोविंद काळे,अनुराधा पंडित सहभागी होते. सूत्रसंचलन अनुराधा पंडित यांनी केले. किरण वाघमारे यांनी संमेलनाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी प्रणिता सोनकांबळे, नालंदा शिंदे उपस्थित होते.



# बार्टी तर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**हिंगोली/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष साहय विभागाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था( बार्टी ) पुणे, संमतांदूताच्या वतीने कळमनुरी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी जयंती निमित्त ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री धनंजय मुंडे ,राज्य मंत्री विश्वजित कदम प्रधान सचिव पराग जैन, बार्टी चे महासंचालक कैलास कणसे मुख्य प्रकल्प संचालक प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पनेतून जिल्हा प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत सुनीता आवटे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते जयाजी पाईकराव यांनी आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर , साहित्यवर प्रकाश टाकला नागिरकांनी आण्णाभाऊ साठे साहित्य वाचण्यासाठी जयाजी पाईकराव आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता आवटे मॅडम ,तर आभार प्रदर्शन गजानन अंभोरे यांनी केले. ऑनलाईन कार्यक्रमास लाईव्ह उपस्थितीमध्ये भीमराव इंगोले, सचिन रोडगे, सम्राट ढेपे, दीपक बलखंडे, सरला गाडे ,के जी मस्के, सुप्रिया हनवते आदी उपस्थित होते.

# आ.राजू नवघरे यांनी ऑनलाईन पद्धतीने साजरी केली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती

। औंढा नागनाथ दि. ७ ।

औंढा तालुक्यातील जवळा बाजार या गावी कोरोना महामारीच्या काळामध्ये बार्टी, पुणे मार्फत अत्यंत अनोखा उपक्रम हाती घेऊन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम हा केंद्रीय मंत्री धनंजय मुंडे, सा.न्याय व वि.सहा.विभाग, राज्यमंत्री (सा.न्या.व.वि.स.वि) विश्वजित कदम, (भाप्रसे) पराग जैन-नैनुटीया, प्रधान सचिव (सा.न्या.व.वि.स.वि), कैलास कणसे महासंचालक बार्टी यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसमत विधानसभा मतदारसंघाचे आ.राजू नवघरे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.शेख



रफिक एम.आय.पी. वरिष्ठ महाविद्यालय जवळा बाजार हे होते. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त दि.२ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११:३० वाजता झूम मिटींग व व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रबोधन कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे होस्टिंग (आयोजन) समतादूत ड.रहीम सलीम कुरेशी व सुकेश कांबळे यांनी केले त्यांना जिल्हा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांनी मॉडरेटर म्हणून सहकार्य केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा अल्पसंख्यांक विभागाचे कार्यध्यक्ष सय्यद फारुख साहेब, जवळाबाजार सर्कलच्या जिल्हा परिषद सदस्य जिवलता परिहार, पंचायत समिती सदस्य बाळू बोडखे, हट्टा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोरे, गोरेगावचे अप्पर तहसीलदार वैजनाथ भालेराव साहेब, ग्रामपंचायत जवळा बाजार चे सरपंच फैसल पटेल, जवळा बाजारच्या नवनियुक्त न्यायाधीश श्वेता परिहार, सर्व ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आदित्य आहेर, मानव मुक्ती मिशनचे सर्व सदस्य, सहारा चारीटेबल ट्रस्ट चे सदस्य, वकील मंडळी पैकी ड.खंडेलवाल साहेब, रामजी कांबळे, सोपान ढोबळे, अंकुश ढोबळे तसेच अंगणवाडी सेविका सुनीता दांगडा, अभिव्यक्ती विचार मंच, जवळा बाजार चे सर्व सदस्य व गावातील इतर बरेच व्यक्ती हे सर्व ऑनलाईन उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी

# ऑनलाइन पद्धतीने झाली साजरी



**शहादा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे अंतर्गत समतादुतांमार्फत नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी वर्ष कोरोना प्रादुर्भावामुळे झुमअॅपवर ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आली.

यात १ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट सलग तीन दिवस कार्यक्रम घेण्यात आले पहिल्या दिवशी अण्णाभाऊ साठे प्रतिमा पुजन करुन पुष्पहार टाकुन अभिवादन करण्यात आले व त्यांच्या कार्याविषयी माहीती दिली, दुसऱ्या दिवशी त्यांचे साहित्य,लिखाण, कादंबरी फकीराच्या माध्यमातुन केलेले वर्णन व पोवाड्यातुन त्यांनी केलेली जनजागृती व अवघ्या दीड दिवस शिक्षण घेतलेल्या व्यक्तीने क्रांती घडवुन आणली याविषयी प्रबोधन करण्यात आले व त्यांच्या संघर्षमय जिवनाचे कार्यांचे महत्व सांगण्यात आले व तिसऱ्या दिवशी त्यांच्या संपुर्ण जिवन प्रवासा बद्दल सामान्य माणसाला कशी प्रेरणा मिळते हे प्रबोधनातुन सांगितले आणि शेवटी गायक योगेश सामुद्रे यांनी अण्णाभाऊंचे गाजलेले छकड 'माझी मैंना गावावर राहीली' गायली व संगितकार मिलिंद सामुद्रे व कोरस प्रदिप सामुद्रे यांनी सादर केले .या सर्व कार्यक्रमास सहकार्य लाभले.

अध्यक्ष प्रा.एकनाथ पाटील, डॉ.सतिष भांडे, समाजसेवक तात्याजी पवार व वक्ते अॅडव्होकेट भाईदास बिरारे,विकी डोडवे,जयश्री आर. कढरे ,मिनाक्षी दांडवेकर ,एच.पी.करणकाळे यांचे तर उपस्थितांमध्ये राहुल आखाडे,रिषभ पाटील,निखिल सोनवणे,विनोद गोगे,हर्षद पानपाटील,बापु महिरे, राकेश आगळे,सपना वाघ,नरेंन्द्र मोरे,विघ्नेश पाटील,पप्पु पानपाटील, समीर खाटीक,जावेद खाटिक असे होते हा सर्व उपक्रम हा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मंत्री मा.धनंजय मुंडे साहेब, राज्यमंत्री मा.विश्वजित कदम,मा.पराग जैन -नैनुटीया(भाप्रसे)प्रधान सचिव, निबंधक यादव गायकवाड(बार्टी), बार्टीचे महासंचालक मा.कैलास कणसे व श्रीमती प्रदन्या वाघमारे यांच्या संकल्पनेतुन व जिल्हा प्रकल्प अधिकारी बी.वाय.पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा समतादुत जयश्री आर.कढरे व एच.पी.करणकाळे यांनी केला.

# बार्टी समतादूत प्रकल्पा अंतर्गत अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी

## परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी, सवलती व दिशा अश्या अनेक विषयांवर मार्गदर्शन

■ ऑनलाईनच्या माध्यमातून सप्ताहाचे आयोजन

**ता.प्रतिनिधी/ ६ ऑगस्ट**

**परतवाडा** : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे मार्फत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात मोफत ऑनलाईन वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून, कष्टकरी व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे, असं ठणकावत मनामनांत क्रांतीची ठिणगी पेटविणारे थोर साहित्यसम्राट, महान शाहीर अण्णाभाऊ साठे यांची 100 वी जयंतीनिमित्त अण्णाभाऊंच्या कार्याला उजाळा दिला. हा कार्यक्रम धनंजय मुंडे मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहा.विभाग, विश्वजित कदम, राज्यमंत्री (सा.न्या.व. वी.स.वी.), पराग जैन-नैनुटिया (भाप्रसे) प्रधान सचिव (सा.न्या.व. वी.स.वी.) कैलास कणसे महासंचालक बार्टी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालिका, राहुल कराळे सहाय्यक प्रकल्प संचालक, विजय वानखेडे अमरावती प्रकल्प अधिकारी यांच्या ऑनलाइन माध्यमातून अमरावती जिल्ह्यात चार दिवशीय प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची दुस-या सत्राची जबाबदारी समतादूत कु.करुणा भोपळे (अंजनगाव सुर्जी) व त्यांच्या टीम ला देण्यात आली होती. या टीममध्ये समतादूत शीतल निभोरकर, सोनाली रंगारी, सलीमखान पठाण, तेजस्विनी भोसले या टीम चा समावेश होता. आज च्या मार्गदर्शनाचा विषय परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी, दिशा व सवलती या विषयाचे प्रमुख वक्ते होते अश्विन मेश्राम, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विजय वानखेडे (प्रकल्प अधिकारी अमरावती, गायक, कवी) यांनी सुद्धा अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश इंगळे सामाजिक कार्यकर्ते (क्राईम आणि आंबनगर की सुबहं हे त्यांचे साप्ताहिक) यांनी सुद्धा छान मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विजय वानखेडे अधिकारी व सर्व समतादूत यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली रंगारी, तर आभार प्रदर्शन तेजस्विनी भोसले यांनी मानले व सर्व कार्यक्रमाची तांत्रिक जबाबदारी करुणा भोपळे, शीतल निंभोरकर व सलीम खान पठाण यांनी यशस्वीरित्या पार पडली. अंजनगाव सुर्जी, भातकुली, चांदुर रेल्वे, वरुड आणि सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनीचांगला प्रतिसाद दिला.



# आ. राजू नवघरे यांची बार्टीच्या उपक्रमास ऑनलाईन हजेरी

**प्रतिनिधी,**
**हिंगोली, ७ ऑगस्ट**

औंढातालुक्यातील जवळा बाजार-येथे कोरोना महामारीच्या काळामध्ये बार्टी, पुणे मार्फत अत्यंत अनोखा उपक्रम हाती घेऊन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विधानसभा मतदार संघाचे आ. राजू नवघरे यांनीही ऑनलाईन सहभाग घेतला.

कोरोनाच्या संसर्ग टाळण्यासाठी बार्टीचा कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आला यावेळी सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, राज्य मंत्री विश्वजित कदम, प्रधान सचिव पराग जैन - नैनुटीया, बार्टीचे महासंचालक कैलासकणसे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार माननीय श्री. राजू नवघरे , तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. शेख रफिक जवळा बाजार हे होते. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त दिनांक २ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी साडेअकरा ११:३० वाजता झूम मिटींग व व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रबोधन कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सदरकार्यक्रमाचे होस्टिंग (आयोजन) समतादूत ऍडव्होकेट. रहीम सलीम कुरेशी व सुकेश कांबळे यांनी केले व त्यांना जिल्हा प्रकल्प अधिकारी- सिद्धार्थ गोवंदे यांनी मॉडरेटर म्हणून सहकार्य केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हा अल्पसंख्यांक विभागाचे कार्यअध्यक्ष सय्यद फारुख, जवळाबाजार सर्कलच्या जिल्हा परिषद सदस्य जिवलता परिहार, पंचायत समिती सदस्य बाळू बोडखे, हट्टा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोरे, गोरेगावचे अप्पर तहसीलदार वैजनाथ भालेराव, ग्रामपंचायत जवळा बाजारचे सरपंच फैसल पटेल, जवळा बाजार च्या नवनियुक्त न्यायाधीश श्वेता परिहार, सर्व ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष आदित्य आहेर, मानव मुक्ती मिशन चे सर्व सदस्य, सहारा चारीटेबल ट्रस्ट चे सदस्य, वकील मंडळी पैकी ॲड खंडेलवाल, राम कांबळे, सोपान ढोबळे, अंकुश ढोबळे तसेच अंगणवाडी सेविका सुनीता दांगडा, अभिव्यक्ती विचार मंच, जवळा बाजार चे सर्व सदस्य मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.